# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

## मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ सभा सुचना क्र. ०१ दिनांक २०/०४/२०१८

**विषय :- ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे व कचरा निर्मितीचे ठिकाणीच ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करणेकामी गृह सोसायटयांना मालमत्ता करामध्ये ५% सवलत देणे बाबतचा प्रस्ताव**

**प्रस्तावाचा मजकूर :-** दि. ०२ ऑक्टोबर २०१४ पासुन संपुर्ण देशामध्ये स्वच्छ भारत अभियान सुरु झाले आहे. या अभियांनातर्गत १) शहरे हागणदारी मुक्त करणे व २) घनकचरा व्यवस्थापन या दोन प्रमुख बाबींमध्ये गुणात्मक बदल घडवून १००% यशस्वी करणे हा केंद्र व राज्य शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रम आहे. या मानवी जीवन व प्राणिमात्राबरोबरच जलजन्य, वनस्पती, भूभाग, परिस्थितीक पर्यावरणाचे संवर्धन करणेसाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखला आहे व त्याप्रमाणे मनपाने वैयक्तिक शौचालय १०,६०७, सामुदायिक शौचालये ३५२, सार्वजनिक शौचालये ३५, बांधुन दि.२७/०७/२०१७ रोजी QCI या संस्थेने वसई विरार शहर मनपास हागणदारीमुक्त घोषित केले आहे.

उपरोक्त यशप्राप्तीबरोबरच घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी मनपाने शास्त्रीय पध्दतीने कृती आराखडा तयार केला असुन त्यामध्ये दैनंदिन ओला व सुका कच-याचे वर्गीकरण करणेसाठी स्वतंत्र हिरव्या व निळया कचरा कुंडयांची व्यवस्था केलेली आहे. हा वेगवेगळा केलेला कचरा स्वतंत्र हिरवा व निळया रंगाच्या वाहनांद्वारे वाहतुक करुन गोखिवरे येथील क्षेपणभुमीवर विस्थापित करणेची प्रक्रिया सुरु केली आहे. याबरोबरच सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट सन २०१६ मध्ये ५००० चौ.मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळावर वसलेल्या गृहसंस्थांनी कच-याचे निर्मितीचे ठिकाणीच खतनिर्मिती करणेची कायद्यातील तरतुद आहे. सर्वत्र कच-याची समस्या अधिकाधिक वाढत असताना कचरा निर्मितीचे ठिकाणी खतनिर्मिती करणे याशिवाय घनकच-याच्या व्यवस्थापनासाठी दुसरा योग्य पर्याय उपलब्ध नाही.

RWA, गृहसंस्था, व्हेजिटेबल मार्केटस, चिकन -मटण मार्केटस, बॅक्वेंट हॉल्स, शाळा - महाविद्यालये, रुग्णालये, नाटक - सिनेमागृहे, औद्योगिक वसाहती संस्था इ. यांना याबाबत अधिकाअधिक प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. यासाठी पूणे, मुंबई, नवी मुंबई या प्रगतीशील महानगरपालिका असे प्रयोग करणा-यांना मालमत्ता करामध्ये सवलत देत आहे. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने सुध्दा अशा गृहनिर्माण संस्थांना वार्षिक मालमत्ता करात सुट दिल्यास नागरिकांना प्रोत्साहन मिळेल व कचरा निर्मितीचे ठिकाणीच ओल्या कच-यापासुन खतनिर्मिती होवून सदर खताचा वापर गृहसोसायटयांच्या बागेमध्ये ,मनपा बगीचामध्ये शेतक-यांचे शेतांमध्ये बाजारपेठांमध्ये तसेच IFMS या पोर्टलवर नोंदणी करुन निर्माण झालेल्या खतास सार्वत्रिक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकेल. परिणामी घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६,अंमलबजावणी साठी स्वच्छ भारत अभियांनातर्गत या प्रकारासाठी गुण दिले जाणार असुन आपल्या शहराची स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत रॅकिंग वाढणेसाठी मदत होणार आहे. अनुषंगाने पर्यावरणाचे संवर्धन होणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४० (ब) अन्वये ज्या गृहनिर्माण संस्था ओल्या कच-याचे खतनिर्मिती करतील अशा गृहसंस्थांना, वार्षिक मालमत्ता करात ५% सवलत देणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेमध्ये ठेवणेस शिफारस आहे.

**प्रस्तावाचा निर्णय** :- RWA, गृहसंस्था, व्हेजिटेबल मार्केटस, चिकन -मटण मार्केटस, बॅक्वेंट हॉल्स, शाळा - महाविद्यालये, रुग्णालये, नाटक -सिनेमागृहे, औद्योगिक वसाहती संस्था इ. यांना याबाबत अधिकाअधिक प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. यासाठी पूणे, मुंबई, नवी मुंबई या प्रगतीशील महानगरपालिका असे प्रयोग करणा-यांना मालमत्ता करामध्ये सवलत देत आहे.

त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने सुध्दा अशा गृहनिर्माण संस्थांना वार्षिक मालमत्ता करात सुट दिल्यास नागरिकांना प्रोत्साहन मिळेल व कचरा निर्मितीचे ठिकाणीच ओल्या कच-यापासुन खतनिर्मिती होवून सदर खताचा वापर गृहसोसायटयांच्या बागेमध्ये .मनपा बगींचामध्ये शेतक-यांचे शेतांमध्ये बाजारपेठांमध्ये तसेच IFMS या पोर्टलवर नोंदणी करुन निर्माण झालेल्या खतास सार्वत्रिक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकेल. परिणामी घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६,अंमलबजावणी साठी स्वच्छ भारत अभियांनातर्गत या प्रकारासाठी गुण दिले जाणार असुन आपल्या शहराची स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत रॅकिंग वाढणेसाठी मदत होणार आहे. अनुषंगाने पर्यावरणाचे संवर्धन होणार आहे.

खतनिर्मिती करणा-या गृहसंस्थाना ५% मालमत्ता करामध्ये सवलत देणेच्या प्रस्तावास व प्रशासनाने करावयाच्या कार्यवाहीस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नांव - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)
व स्वाक्षरी —

अनुमोदकाचे नाव - चंद्रकात गोरीवले
व स्वाक्षरी —

अनुकूल संख्या ---------------- प्रतिकुल संख्या------------------- तटस्थ संख्या------------
ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजूर/नामंजूर

सत्य प्रत
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

Sd/-
(रुपेश जाधव)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)